THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 19TH MARCH 1868.

☞ *Separate Paging is given to this Part in order that it may be filed as a separate Compilation. The paging of this Part commence with the Number for January 1867.*

## PART X.—Marathi Acts, &c.

### ACT No. I. of 1868.

---

इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिलाचा खालीं लिहिलेला आक्ट सन १८६८ चे जान्युआरी महिन्याचे ३ रे तारिखेस गवरनर जनरल साहेबांनी मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं छापून प्रसिद्ध केला असे.

## सन १८६८ चा आक्ट १ ला.

### इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिलांचे आक्टांतील मजकूर आटोपसर करण्याविषयां व इतर कारणांविषयीं आक्ट.

इंडियाचे गवरनर जनरल इन्कौन्सिल आक्ट करतात त्यांतील मजकूर आटोपसर करणे व त्या आक्टा संबंधी कित्येक ठराव करणे अवश्य आहे यास्तव खालीं लिहिल्या प्रमाणे ठरविलें आहे. उद्देश.

१. या आक्टास "सन १८६८ चा सामान्य कलमाचा आक्ट" असें नांव दिलें आहे. लहान सरनामा.

२. या आक्टांत व हा आक्ट अमलांत आल्या नंतर इंडियाचे गवरनर जनरल इन्कौन्सिल जे आक्ट करतील त्या सर्व आक्टांत प्रकरणास अगर पूर्वापर संबंधास बाध येत नसेल तर, अर्थाचें कलम.

लिंग. (१.) पुल्लिंगी शब्दांत स्त्रियांचा समावेश होतो असें समजावें.

वचन. (२.) एक वचनी शब्दांत बहु वचनाचा समावेश होतो आणि बहु वचनी शब्दांत एक वचनाचा समावेश होतो.

"मनुष्य." (३.) "मनुष्य" या शब्दांत कोणतेही मंडळीचा अगर जमातीचा अगर मनुष्यांचे समुदायाचा समावेश होतो. मग त्या मंडळीस अगर जमातीस अगर समुदायास सनद मिळाली असो अगर नसो.

"वर्ष" व "महिना." (४.) "वर्ष" व "महिना" या शब्दांचा अर्थ इंग्लिश क्यालेंडर ह्मणजे पंचांग यांत लिहिल्या प्रमाणे वर्ष व महिना समजावा.

"स्थावर मिळकत." (५.) "स्थावर मिळकत" या शब्दांत जमीन व जमिनींतून उत्पन्न होणारे फायद्याचा व जमिनीस चिकटलेल्या वस्तूंचा व जमिनीस चिकटलेल्या वस्तूंला कायम लावलेल्या वस्तूंचा समावेश होतो असें समजावें.

"जंगम माल." (६.) "जंगम माल" या शब्दांत स्थावर मिळकत खेरीज करून इतर सर्व प्रकारचे मालमत्तेचा समावेश होतो असें समजावें.

"मलिका माआझमा." (७.) "मलिका माआझमा" या शब्दांत त्यांचे वारसांचा व राणीसाहेबांचे मागून गादीवर बसणारांचा समावेश होतो असें समजावें.

ब्रिटिश इंडिया. (८.) "ब्रिटिश इंडिया" ह्मणजे प्रिन्स आफ् वेल्स ऐलंड या नांवाचें बेट व सिंगापूर व मलाका हीं संस्थानें खेरीज करून जो इतर मुलूक हिंदुस्थानचा राज्यकारभार अधिक चांगले रीतीने चालविण्या विषयीं आक्ट या नांवाचा विक्टोरिया राणीच्या कारकिर्दीतल्या २१ व्या व २२ व्या वर्षांतील १०६ वा चाप्टर ह्मणून आक्ट आहे त्याच्या आधारानें मलिका माआझमा यांच्या अमलांत आला असेल तो मुलूक.

इंडिया सरकार. (९) "इंडिया सरकार" ह्या शब्दांचा अर्थ गवरनर जनरल आफ् इंडिया इन्कौन्सिल असा समजावा; किंवा, गवरनर जनरल हा कौन्सिला पासून दूर गेल्यास, कायद्यानें दिलेल्या अधिकाराच्या विवक्षेनें प्रेसिडेंट इन् कौन्सिल असा; किंवा एकटा गवरनर जनरल, असा समजावा.

ठिकठिकाणचें सरकार. (१०.) "ठिकठिकाणचें सरकार" हे शब्द ज्या आक्टांत असतील तो आक्ट ब्रिटिश इंडियाचे ज्या भागांत अमलांत येईल त्या भागांत राज्य कारभार चालविण्याचा अधिकार कायद्याअन्वयें ज्या मनुष्यास असेल तो मनुष्य असा अर्थ "ठिकठिकाणचें सरकार" या शब्दांचा समजावा व या शब्दांत चीफ कमिशनराचा समावेश होतो असें समजावें.

"हे कोर्ट." (११.) "हे कोर्ट" या शब्दांचा अर्थ सदहू प्रकारचे भागांतील अपिलाचें वरिष्ठ दिवानी कोर्ट असा समजावा.

"डिस्ट्रिक्ट जज्ज." (१२.) "डिस्ट्रिक्ट जज्ज" ह्मणजे एकाद्या मुख्य अवल दिवानी कोर्टाचा जज्ज. परंतु हे कोर्ट जेव्हां अवल दिवानी फिर्यादी घेण्याची आपली मामूल किंवा विशेष हुकुमत चालवील तेव्हां त्या कोर्टाचा समावेश त्या शब्दांत होत नाहीं असें समजावें.

"माजिस्ट्रेट." (१३.) "माजिस्ट्रेट" या शब्दांत फौजदारी इनसाफाचें काम चालविण्याचे रीतीविषयींचे कायद्याअन्वयें माजिस्ट्रेटाचा सर्व अधिकार अगर कांहीं अधिकार चालविणारे सर्व मनुष्यांचा समावेश होतो असें समजावें.

"बारिस्टर." (१४.) "बारिस्टर" या शब्दाचा अर्थ इंग्लंडचा किंवा ऐर्लंडचा बारिस्टर किंवा स्काटलंडांतील फ्याकल्टी आफ आडवोकेट्सचा मेंबर असा समजावा.

(१५.) कलम हा शब्द ज्या आक्टांत असेल त्या आक्टाचें कलम असा बोध "कलम" या शब्दा वरून होतो असें समजावें. "कलम."

(१६.) "मृत्युपत्र" या शब्दांत मृत्युपत्राचे पुरवणीचा व आपखुषीने मालमिळकतीची मरणोत्तर वाटणी करण्याविषयीं केलेले सर्व लेख यांचा समावेश होतो असें समजावें. "मृत्युपत्र."

(१७.) ज्या प्रसंगीं मनुष्यांस शपथे बद्दल प्रतिज्ञा व इकरार करण्याची कायद्याची परवानगी असेल त्या प्रसंगीं प्रतिज्ञा व इकरार करणे याचा समावेश "शपथ" व "आण" व "प्रतिज्ञा" या शब्दांत होतो असें समजावें. "शपथ "आण" व "प्रतिज्ञा.

(१८.) हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा आहे त्यांत सांगितलेले दोहों प्रकारां पैकीं कोणतेही एका प्रकारची कैद असा बोध "कैद" या शब्दा वरून होतो असें समजावें. "कैद."

(१९) ज्या मनुष्यांस आपले शास्त्रा प्रमाणे दत्तक घेण्याचा अधिकार आहे त्या मनुष्याचे बाबतींत "मुलगा" या शब्दांत दत्तक मुलग्याचा समावेश होतो आणि "बाप" या शब्दांत दत्तक घेणारे बापाचा समावेश होतो असें समजावें. "मुलगा" "बाप."

३. हा आक्ट अमलांत आल्या नंतर इंडियाचे गवरनर जनरल इन्कौन्सिल जे आक्ट करतील त्या सर्व आक्टांत.

(१) कोणताही रद्द झालेला स्टाटूट किंवा आक्ट किंवा कायदा सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं पुनः संस्थित करण्याचा उद्देश असेल तर तो उद्देश स्पष्ट लिहिणे अवश्य आहे असें समजावें. रद्द झालेले कायदे पुनः संस्थित करणे.

(२) दिवसाचे किंवा कालाचे इतर कोणतेही विभागाचे श्रेणींतून पहिला दिवस किंवा विभाग टाकून देणे असेल तर "पासून" या शब्दाचा उपयोग केला ह्मणजे पुरे असें समजावें. वेळाचा प्रारंभ.

(३) दिवसाचे किंवा कालाचे इतर कोणतेहि विभागाचे श्रेणींत शेवटचे दिवसाचा किंवा विभागाचा समावेश करणे असेल तर "पर्यंत" या शब्दाचा उपयोग केला म्हणजे पुरे असें समजावें. वेळाचा शेवट.

(४) कोणतेही कामदाराचे किंवा ज्या कारपोरेशनाचे मेंबराची जागा कधीं रिकामी राहणार नाहीं त्या कारपोरेशनाचे स्थानापन्नाशीं कोणतेही कायद्याचा संबंध दाखविणे असेल तर त्या कायद्याचा संबंध त्या कामदाराशीं किंवा कारपोरेशनाशीं असेल तो सांगितला ह्मणजे पुरे. स्थानापन्न.

(५) कोणतेहि अधिकाराचे मुख्यासंबंधी किंवा वरिष्ठासंबंधी कायदा असेल तो जे डेप्युटी किंवा ताब्यांतील अमलदार आपले मुख्याचे बद्दल त्या अधिकाराचीं कामे कायदेशीर रीतीनें चालवीत असतील त्यांस लागू आहे असें सांगणे असेल तर वरिष्टाचीं कामें लिहिलीं ह्मणजे पुरे. मुख्य अधिकारी व त्याचे ताब्यांतील अमलदार.

(६) कोणतेही अधिकाराचीं कामें कोणी मनुष्य किंवा कांहीं मनुष्यें चालवित असतील त्यांस कोणताही कायदा लागू आहे असें सांगणें असेल तर तीं कामें जो अधिकारी हल्लीं चालवित असेल त्याचे किंवा तीं कामें जो अधिकारी सामान्यतः चालवित असेल त्याचे हुद्याचें नांव सांगितलें ह्मणजे पुरे. एका अधिकाऱ्याचे जागेवर दुसरा अधिकारी.

४. हल्लीं अमलांत असणारे किंवा पुढें अमलांत येणारे कोणतेहि आक्टावरून किंवा कायद्यावरून कोणतेहि मालाचे किंवा व्यापाराचे जिनसाचे अमुक परिमाणावर ( तें परिमाण प्रमाणानें जकात घेण्याचा अधिकार आहे.

वजनाने असो किंवा मापानें असो किंवा किंमतीने असो. ) कष्टमची किंवा एक्सैसची ड्युटी (जकात) किंवा तसे प्रकारची दुसरी कोणतीही जकात घेतां येत असेल तेव्हां त्याच दराने तसीच जकात अधिक किंवा कमी मालावर घेतां येईल असें समजावें.

दंड वसूल करणे.

५. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्या विषयीं कायदा आहे त्याचे त्रेसष्टावे कलमाचे प्रारंभा पासून सत्तरावे कलमाचे शेवटा पर्यंत कलमांतील व फौजदारी इन्साफाचें काम चालविण्याचे रीती विषयीं कायदा आहे त्याचे एकसष्टावे कलमांतील ठराव पुढें कोणताही आक्ट ठरेल त्याच्या आधाराने दंड करण्यांत येतील त्यांस लागू होतील; परंतु त्या आक्टांत या विरुद्ध मुद्दाम ठराव असेल तर लागू होणार नाहींत.

कोणताही कायदा रद्द झाल्यापूर्वी त्या कायद्यान्वयें कामें झालीं असतील त्यांस व्यत्यय येत नाहीं.

६. कोणताही स्टाटूट किंवा आक्ट किंवा कायदा रद्द झाला ह्मणजे त्यावरून खालीं लिहिलेले गोष्टीस व्यत्यय येतो असें समजूं नये ह्मणजे रद्द करणारा आक्ट अमलांत येण्या पूर्वी कोणतेंही कृत्य घडलें असेल किंवा गुन्हा केला असेल त्यास अथवा कोणतेंही दंडाचा किंवा गुन्हेगारीचा पेंच आला असेल त्यास अथवा कोणतेंही काम चाललें असेल त्यास व्यत्यय येतो असें समजूं नये.

आक्ट न्यायाधिकारनात्याने लक्षांत ठेवावे.

७. इन्साफाचीं कोर्टें दिवानी हुकुमत चालवित असोत किंवा इतर कोणतीही हुकुमत चालवित असोत त्या सर्व कोर्टांनी आणि ज्या मनुष्यास कायद्यावरून किंवा पक्षकारांचे अनुमताने जबानी घेण्याचा अधिकार असेल त्यां सर्व मनुष्यांनी खालीं लिहिलेले सर्व आक्ट व कायदे न्यायाधिकारनात्याने लक्षांत ठेवावे ह्मणजे जे आक्ट व कायदे इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिलांनी व मद्रासचे गवरनर इन् कौन्सिलानी व मुंबईचे गवरनर इन् कौन्सिलानीं व बंगालचे लेफ्टेनेंट गवरनर इन् कौन्सिलनी किंवा ब्रिटिश इंडियाचे इतर कोणतेही भागांतील तसेच अधिकाऱ्याने या पूर्वी केले असतील किंवा या पुढें करतील ते सर्व आक्ट व कायदे न्यायाधिकारनात्याने लक्षांत ठेवावे. मग ते आक्ट व कायदे सार्वजनिक प्रकारचे असले किंवा खानगी प्रकारचे असले तरी लक्षांत ठेवावे.

कोणतीही घडलेली गोष्ट सांगितली असेल तें सांगणें त्या गोष्टीचे खरेपणाचा प्रथम दर्शनी पुरावा आहे.

८. इंडियाचे गवरनर जनरल इन् कौन्सिलाने या पूर्वी केलेले किंवा पुढें करावयाचे कोणतेही आक्टांत कोणतीही घडलेली गोष्ट सांगितली असेल तें सांगणें, त्या गोष्टीचे खरेपणा विषयीं प्रथम दर्शनी पुरावा आहे असें सदर्हू प्रकारचे सर्व कोर्टांनीं व मनुष्यांनीं समजावें.

(True Translation)

VENAYEK WASSOODEW,

Oriental Translator to Government.